महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ २७०२
Email – tourism-t2@mah.gov.in

क्रमांक : टिडीसी-२०२४/०७/प्र.क्र.०२/पर्यटन-२
दिनांक : २२ एप्रिल, २०२५

प्रति,

व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

विषय : महाराष्ट्रातील ०५ ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित संग्रहालय / थीमपार्क उभारणे.

संदर्भ : १) आपले दि.२९.०३.२०२५ चे पत्र.
२) या विभागाचे क्र.विसस-२०२०/०२/प.क्र.९६/पर्यटन-२, दि.१७.०४.२०२५ चे पत्र.

महोदय,

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित शिवसृष्टी उभारण्याबाबत ०४ स्थळे व संकल्पना यांना मान्यता प्राप्त झाली आहे. त्याशिवाय संदर्भाधीन क्र.२ च्या पत्रान्वये कोकण विभागाकरिता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याशेजारी "छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती व आरमार" या संकल्पनेवर आधारित शिवसृष्टी उभारण्याबाबत मंजूरी मिळाली आहे.

०२. आता उपरोक्तप्रमाणे मान्यता मिळालेल्या एकूण ०५ शिवसृष्टी संकल्पना ठिकाणे व संकल्पना खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मंजूर करणेत येत आहेत :-

| अ.क्र. | स्थळ | संकल्पना |
|---|---|---|
| १ | फर्दापूर (अजिंठा), जिल्हा - छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजी महाराज व त्यांचे जीवनावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव. |
| २ | नशिराबाद, तालुका जिल्हा - जळगाव | छत्रपती शिवाजी महाराजांची वंशावळ व मावळे |
| ३ | ठाणे जिल्हयात घोडबंदर किल्ल्याशेजारी | छत्रपती शिवाजी महाराजांची युध्दनीती व आरमार |
| ४ | हेळवाक-कोयनानगर, जिल्हा - सातारा | महाराणी ताराबाई, छत्रपती राजाराम महाराज व त्यांच्या जीवनावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा प्रभाव. |
| ५ | नागपूर शहर, जिल्हा - नागपूर | राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवाजी महाराज यांचा आजच्या पिढीवर प्रभाव. |

०३. उपरोक्त तक्त्यामधील नशिराबाद, जि.जळगाव, हेळवाक-कोयनानगर, जि.सातारा व नागपूर शहर, जि.नागपूर येथे शिवसृष्टी उभारणेसाठी पुरेशी जागा हस्तांतरीत करण्याची कार्यवाही करणेत यावी. तसेच या ठिकाणी पर्यटकांना पुरेशा सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत महामंडळाद्वारे कार्यवाही करावी. मंजूर करणेत आलेल्या ०५ स्थळांसाठी प्रति स्थळ रु.५०.०० कोटी इतक्या निधीच्या मर्यादेत प्रकल्पाची आखणी करण्याबाबत आपल्या स्तरावरुन संबंधितांना आदेशित करावे आणि यापूर्वी मा.उच्चाधिकार समितीच्या बैठकीत ज्या प्रकल्पाबाबत ज्या दुरुस्ती सुचविणेत आलेल्या होत्या, त्यानुसार प्रकल्प अहवाल सादर करावे.

आपला,
22.4.2025
(डॉ. न. आ. कदम)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सहपत्र : वरीलप्रमाणे.

c:\users\prashant.pujare\desktop\अमृत महोत्सव प्रारुप.docx

सत्यमेव जयते
मंत्रालयीन सेवा
**महाराष्ट्र शासन**
**पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२०२ २७०२ Email – tourism-t2@mah.gov.in

क्रमांक : विसस-२०२०/०२/प्र.क्र.९६/पर्यटन-२ दिनांक : ०९ एप्रिल, २०२५

प्रति,

१. व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई.

२. जिल्हाधिकारी, ठाणे.

विषय : मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याबाबत.

संदर्भ : जिल्हाधिकारी कार्यालयाचे क्र.जिनिस/प्रादेपर्यटन/मिभा-शिवसृष्टी/का-१/२०२३-२४/५९२८, दि.१०.१०.२०२४ चे पत्र.

महोदय,

विषयांकित प्रकरणी नमूद करण्यात येते की, प्रादेशिक पर्यटन योजनेंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याबाबतच्या प्रस्तावास अनुसरुन वित्त व नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या मुद्यांच्या पुर्ततेबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे. मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दि.०९.१०.२०२४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेला निर्णयानुसार कोकण विभागाकरिता मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर किल्ल्याशेजारी शिवसृष्टी उभारण्याबाबत निदेश प्राप्त झाले आहेत.

त्यानुसार मंजूर संकल्पना व प्रकल्प अहवाल सादर करणेसाठी कार्यवाही करण्यात यावी, असे कळविण्याचे मला निदेश आहेत.

आपली,

अनिता तुम्मुलवार
09/04/2025

**(अनिता तुम्मुलवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

सहपत्र : वरीलप्रमाणे.

प्रत,

निवडनस्ती (पर्यटन-२)